## नियमित दिवाणी दावा क्र. ८७/२०२०
## निशाणी ०५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा दावा ठरावासाठी, निरंतर ताकीद हुकुमासाठी व जाहीर ठरावासाठी दाखल केला आहे. त्यात तिने सदरचा अर्ज तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जातील कथनाप्रमाणे मौजे सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे चतु:सिमीत शेतजमिन मिळकतीं संदर्भात सदरचा अर्ज आहे. प्रतिवादी क्र. १ हे वादीचे वडील असुन प्रतिवादी क्र. २ ते ४ हे चुलते आहेत. प्रतिवादी क्र. ५ ही आत्या आहे. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ च्या वडिलोपार्जित एकत्र हिंदु कुटुंबाच्या मिळकती असुन सदर मिळकतीमध्ये अद्यापपावेतो वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ मध्ये वाटप झालेले नाही.

३. प्रतिवादी क्र. १ हे वादीचे वडील असुन प्रतिवादी क्र. १ ने वादीची आई विमलबाई व वादीची काहीएक चुक नसतांना सुमारे ३५ ते ४० वर्षापुर्वी एका वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून दिले व कुठल्याही प्रकारची अन्नवस्त्राची व्यवस्था न करता एकतर्फा त्याग केला. त्यानंतर अनेकदा प्रयत्न करूनही प्रतिवादी क्र. १ हे वादीच्या आईस नांदावयास घेवून गेलेले नाहीत. त्यानंतर वादी व वादीची आई विमलबाई हिने प्रतिवादी क्र. १ विरूद्ध सिन्नर न्यायालयात अन्नवस्त्र मिळणेकामी खावटीचा चौकशी अर्ज दाखल केला. सदर अर्जाची चौकशी होवून त्याचा निकाल दिनांक १६.१२.१९८६ रोजी होवून तिचा अर्ज मंजुर झाला.

४. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ चे प्रतिवादी क्र. ६ बरोबर अनैतिक संबंध निर्माण झाले. त्यातुन त्यांना प्रतिवादी क्र. ७ ते ९ ही अपत्ये झाली. प्रतिवादी क्र. ६ ते ९ हे प्रतिवादी क्र. १ चे कायदेशीर वारस नाहीत असा ठराव करून मिळणेसाठी सदरचा दावा असल्याने त्यांना प्रतिवादीपणात सामिल केलेले आहे. वादीचे लग्न हे घरातील नातेवाईकांनी लावून दिलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या लग्नाचा खर्च देखील केलेला नाही. अशी परिस्थिती असतांना वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या मालकी व कब्जात असलेल्या दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतींपैकी दावा कलम १अ ही मिळकत नाशिक—पुणे

हायवेच्या बायपाससाठी अधिगृहीत करण्यात आलेली आहे. त्याचा मोबदला म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना रक्कम मिळाल्याचे वादीस समजते. त्यानंतर वादीने प्रतिवादी क्र. १ कडे तिच्या हिश्याच्या रकमेची मागणी केली. परंतु ती देण्यास प्रतिवादी क्र. १ ने टाळाटाळ केली व दावा मिळकतींचे वाटप करण्यास नकार दिला. त्यामुळे प्रस्तुतचा वाटपाचा दावा व मनाई हुकुम मिळणेसाठीचा अर्ज दाखल केला आहे.

**५.** प्रतिवादी क्र. १ व ६ ते ९ तर्फे निशाणी २५ वर अर्जास जबाब/कैफियत दाखल करण्यात आली. त्यात सदर प्रतिवादींचे कथन असे की, वादी हे प्रतिवादी क्र. १ व त्यांची मयत पत्नी विमल यांची मुलगी असुन दिनांक १८.०७.२०१६ रोजी ती मयत झालेली आहे. वादीची आई प्रतिवादी क्र. १ सोबत नांदत नव्हती. तिने सिन्नर न्यायालयात अन्नवस्त्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये मागील व पुढिल रक्कम रू. ९,०००/— अन्नवस्त्रासाठी देवून प्रतिवादी क्र. १ हे वादीला घेवून गेले होते. त्यानंतर त्यांनी वादीचे लग्न थाटामाटात केले. दावा कलम १अ ही मिळकत वादीचे आजोबा व प्रतिवादी क्र.१ चे वडील लक्ष्मण घोडेकर हे एकटे मालक होते व ते हयात असतांना सन २०१९ मध्ये अधिग्रहीत जमिनीचा संपुर्ण मोबदला त्यांनी स्विकारला आहे व त्यांचे हयातीत त्याची विल्हेवाट लावली आहे. त्यामुळे वादीचे म्हणणे खोटे असुन प्रतिवादींना मान्य नाही. प्रतिवादी क्र. १ ते ५ हे भाउ असुन त्यांच्यामध्ये दावा मिळकतीचे अद्याप वाटप झालेले नाही. त्यामुळे वादीस वाटप मागण्याचा हक्क व अधिकार नाही. त्यामुळे दावा रद्द होणेस पात्र आहे. तुर्तातुर्त मनाई हुकुम अर्ज व दावा नामंजुर करण्यात यावा.

**६.** दोन्ही पक्षांची कथने लक्षात घेता उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष आणि कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे :—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी सिद्ध करते काय की, सकृत दर्शनी केस तिचे बाजूने आहे ? | ...नाही |
| २. | वादी सिद्ध करते काय की, न्यायाचा तौलानिक तराजू तिच्या बाजूने आहे ? | ...नाही |
| ३. | वादी सिद्ध करते काय की, अर्ज नामंजुर झाल्यास तिचे अपरिमित असे नुकसान होईल ? | ...नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | ..... | अर्ज नामंजुर करण्यात येत आहे |

## कारणमिमांसा

७. दोन्ही पक्षांच्या विव्दान अधिवक्त्यांचा युक्तिवाद ऐकला.

८. वादीतर्फे प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने निशाणी ०३ सोबत दावा मिळकतींचे सातबारा उतारे, विमलबाई घोडेकर यांचे मृत्यु प्रमाणपत्र, फेरफार नोंद क्र. ४३९३६ चा उतारा, फेरफार क्र. ४८१८० चा उतारा, खातेउतारा क्र. १५०९५, मौजे सिन्नर येथील खाते क्र. १५०९५ चा उतारा, गट क्र. ४१२/२ चा सातबारा उतारा, गट क्र. ४२३, ३२८ व ४४२ चा सातबारा उतारा इ. कागदपत्र दाखल केली आहेत.

९. प्रतिवादींतर्फे त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ वसुली अर्ज १९९/८५ व ३/८७ मधील समजुतीची नक्कल, वादीच्या लग्नाची पत्रिका, दाव्यात समाविष्ट नसलेल्या शेती मिळकती गट क्र. २९२ व ४४० चा सातबारा उतारा ही कागदपत्र दाखल केली आहेत.

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत** :—

१०. प्रस्तुतचा दावा हा वादीने तिचे वडील हयात असतांना वाटपासाठी दाखल केलेला आहे. तसेच, निरंतर मनाई हुकुम देखील मागितलेला आहे. अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांचे प्रतिवादी क्र. ६ बरोबर अनैतिक संबंध निर्माण झाले व त्यातुन प्रतिवादी क्र. ७ ते ९ ही अपत्ये झाली. सदरची बाब दावा गुणदोषावर चालुन पुराव्यानिशी अभिलेखावर येणार आहे. वादीने प्रस्तुत अर्जात नमुद केलेली नाशिक—पुणे बायपाससाठी अधिग्रहीत म्हणून मिळालेली रक्कम बॅकेतुन प्रतिवादींनी काढू नये अशी मागणी केलेली आहे, परंतु प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे सन २०१९ मध्येच सदर रक्कमेची लक्ष्मण घोडेकर म्हणजेच वादीचे आजोबा यांनी विल्हेवाट लावलेली आहे. त्यामुळे सदर रक्कमेबाबत कोणताही मनाई हुकुम देता येणार नाही.

११. दावा मिळकती प्रतिवादींनी त्रयस्थ इसमांना विक्री करू नये व हस्तांतर करू नये याकरीता देखील मनाई हुकुम मागितलेला आहे. तसेच, तिची दावा मिळकतीमध्ये सामाईक कब्जेवहीवाट असल्याचे देखील कथन केले आहे. परंतु वादीची दावा मिळकतीमध्ये सामाईक कब्जेवहीवाट असल्याची बाब

प्रथमदर्शनी सिद्ध झालेली नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या वहीवाटीत असणारी दावा मिळकत वहीवाट करतांना वेळप्रसंगी त्यांना त्यावर बोजा निर्माण करण्याची आवश्यकता भासु शकते. अशा परिस्थितीत बोजा निर्माण न करण्याबाबत तुर्तातुर्त मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. प्रतिवादी दावा मिळकतीची विक्री करण्याच्या तयारीत असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे दावा मिळकतीचे हस्तांतर न करण्याविषयी देखील मनाई हुकुम देता येणार नाही.

**१२.** तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जावर निर्णय देत असतांना त्यामध्ये सकृतदर्शनी तथ्य आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वादीच्या कथनांमध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळून येत नाही. तसेच, न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने नाही. अशा परिस्थितीत तुर्तातुर्त मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसाान होणार आहे. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. ४ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :—

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज (निशाणी ५) नामंजुर करण्यात येत आहे.

सही/—
(श्रीमती एस.एस. देशमुख)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सिन्नर

ठिकाण : सिन्नर
दिनांक : २४.०१.२०२४